पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०१३, दि. १४/०९/२०१९**

**डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**बिटमार्शलचे सतर्कते व संपर्कमुळे महिलेची हरवलेली कागदपत्राची बॅग परत मिळाली.**

---

दिनांक १५/०९/२०१९ रोजी श्री. कांबळे, पोशि ८७८१ व श्री पवार, पोशि ८८२५ यांना प्रभात बिट मार्शल ड्युटी असतांना २०/०० वा. सुमारास ठाणे अंमलदार डेक्कन यांनी फोन द्वारे श्रीमती श्रावणी शेखर पोटफोडे, रा. १४०२ कसबा पेठ, पुणे यांची महत्त्वाची कागदपत्रे असलेले बॅग शारदा सेंटर जवळ, कर्वेरोड पुणे या भागात पडुन गहाळ झाली आहे. त्यांना पोलीस मदतीची आवश्यकता आहे असे कळविल्याने प्रभात बिट मार्शल वरील कर्मचारी यांनी सदर महीलेची भेट घेवुन बॅगचे वर्णन घेवुन बॅगचा शोध घेऊ लागले तेव्हा त्यांनी स्थानिक लोकांनाही बॅग हरवल्याची माहिती देवुन बिट मार्शल वरील कर्मचारी यांनी आपला संपर्क नंबर दिला. दिनांक १६/०९/२०१९ रोजी सदर भागातील सफाई कामगार याने फोन करुन एक कागदपत्राची बॅग मिळाली आहे असे कळविले. प्रभात बिट मार्शल्ने तात्काळ तेथे जावुन बॅग ताब्यात घेवुन खात्री करता श्रीमती श्रावणी पोटफोडे मो. ८३२००६८६३५ यांची असल्याची खात्री झाल्याने त्यांना संपर्क करुन प्रभात पोलीस चौकीस बोलावुन घेवुन १० वी व १२ वी प्रमाणपत्रे, बँकेची कागदपत्रे असलेली बॅग त्यांना परत देण्यात आली. आपली कागदपत्रांची बँग कागदपत्रासह परत मिळाल्याने श्रीमती श्रावणी शेखर पोटफोडे यांनी प्रभात बिट मार्शल वरील कर्मचारी यांचे आभार मानले.

